घराबाहेर आवश्यक कामाकरिताच पडा

योग्य अंतर ठेवा

घराबाहेर नेहमिच मास्क वापरा

वारंवार हाथ धुवा किंवा समन्टियझर वापरा

## Vision

To Develop Skilled and Trained Professional Social Workers with Values and Humanity.

## Mission

Providing higher education to every aspirant of the society with their allround development.




# श्री सरस्वती
## समाजकार्य महाविद्यालय



रिसोड रोड, वाशिम - ४४४ ५०५ (महा.)

**Contact :** 9673580777, 9158277444, 8766941065

**Email :** ssswm718@sgabu.ac.in

**Website :** www.saraswatipragat.edu.in


**श्री सरस्वती प्रगत विद्या प्रसारक मंडळ, वाशिम**
व्दारा संचालित



सर्वांसाठी उच्च शिक्षण : विश्वमानवता

# श्री सरस्वती
## समाजकार्य महाविद्यालय, वाशिम

# माहिती पुस्तीका

बी.एस.डब्ल्यु. • एम.एस.डब्ल्यु.

नॅक "B" दर्जा व अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त

UGC Recognized 2'F' & 12'B'

**Website :** www.saraswatipragat.edu.in

सर्वांसाठी उच्च शिक्षण : विश्वमानवता

## आमचे प्रेरणास्थान



**मा.प्राचार्य एस.एन.कोठारी**

अध्यक्ष

श्री सरस्वती प्रगत विद्या प्रसारक मंडळ, वाशिम



## प्रास्ताविक

**प्रिय विद्यार्थी मित्रांनो,**

आमच्या मातोश्री कांचनदेवी कोठारी यांच्या आशीर्वादाने व वडील श्यामसुंदरजी कोठारी यांच्या प्रेरणेने १९८५ साली स्थापन केलेल्या श्री सरस्वती प्रगत विद्या प्रसारक मंडळाच्या अंतर्गत १९९८-९९ पासून सुरु झालेल्या श्री सरस्वती समाजकार्य महाविद्यालयाने २४ व्या वर्षात पदार्पण केले आहे. हि आनंदाची व गौरवाची बाब आहे.

वाशिम जिल्ह्यातील व लगतच्या परिसरातील विद्यार्थ्यांची समाजकार्याच्या उच्च शिक्षणाची गरज लक्षात घेऊन **BSW** व **MSW** साठी या महाविद्यालयाची सुरवात करण्यात आली. संस्थेने सुरवाती पासुन विद्यार्थांना शैक्षणीक मुलभुत सुविधा उच्च दर्जाच्या करुन दिल्या आहेत कालांतराने महाविद्यालयाचा शास्वत विकास होत आहे आज घडीला महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या ४३० वर पोहचली आहे.

महाविद्यालयात ऑक्टोंबर २०१४ पासून विद्यार्थ्यांचे ज्ञान आणि कौशल्य विकसीत करण्यासाठी समंत्रक प्रशिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम हा अल्पकालीन प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्यात आलेल्या आहे. सन २०१८-२०१९ पासून य. च. म. मु. वी. चे बि. ए. चे अभ्यास केंद्र आणि स्वंयम रोजगाराकरीता 'कौशल्य विकास अभ्यासक्रम' सुरु आहे. **UGC** अंतर्गत **'Bachelor of Vocational Course'** चे विविध व्यावसायीक अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत.

महाविद्यालयाची सुसज्ज अशी भव्य इमारत, सुसज्ज व अद्यावत ग्रंथालय, क्रीडांगण अशा सर्व सोयींनी युक्त असून विद्यार्थांच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजना, सांस्कृतिक मंडळ, समाजकार्य अभ्यास मंच, वार्षिकांक, स्पोर्ट विभाग इत्यादीच्या माध्यमातून विद्यार्थांना विकासाची संधी उपलब्ध करुन दिली जाते.

सन १९९८-९९ साली रुजविलेल्या या रोपट्याचे आज विशाल वटवृक्षात रुपांतर झाल्याचे पाहातांना आमच्या सभासदांना नक्की कृतकृत्व वाटले. तसेच बैंगलोरच्या नॅक मुल्यांकन समितीव्दारे महाविद्यालयास 'B' मानांकन दर्जा प्राप्त आहे.महाविद्यालय नावारुपाला येण्यात आमच्या शिक्षक व शिक्षेत्तर कर्मचारी वर्गाचा महत्वपूर्ण हातभार लागलेला आहे. या सर्वांचे कष्ट आणि अखंड मेहनतीमुळे महाविद्यालयाची उत्तम शैक्षणिक प्रगती होऊन सुमारे ४३० विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत आहेत. महाविद्यालयीन शिक्षणाच्या जोडीने महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगती, संगणक प्रशिक्षण जिल्हा.राज्य व देश पातळीवरील स्पर्धात्मक परीक्षातील सहभाग आणि त्यांनी मिळविलेले यश वाखाणाण्यासारखे आहे. या यशस्वी वाटचालीत मंडळाचे समस्त सभासद, शिक्षणप्रेमी व शिक्षेत्तर कर्मचारी वर्गाचा हातभार लागला आहे. या सगळ्यांच्या साथीने पुढील वाटचालीत मंडळाच्या उपक्रमांची आणि संकल्पनाची यशस्वी कार्यवाही करण्याची ग्वाही देतो.

शासनाच्या धोरणानुसार माहिती तंत्रज्ञानाच्या विशाल युगाला सामोरे जाण्यासाठी श्री प्रगत विद्या शिक्षण प्रसारक मंडळाने महाविद्यालयाची माहिती वेबसाईटमध्ये अद्ययावत करुन सादर केली आहे.

जगातील अनेक देशात कोरोनाच्या विषाणूने थैमान घातले आहे. भारतात मे महिन्याच्या शेवटी कोरोन संक्रमित रुग्णांची संख्या लाखांमध्ये होती. आणि जवळपास हजारो लोकांचा मृत्यु यामुळे झाला आहे. या महामारी मुळे मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात दुरगामी परिणाम होत आहे. त्यापासुन शिक्षण क्षेत्र सुध्दा अलिप्त राहिले नाही. COVID-१९ च्या अनुषंगाने उच्च शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांसाठी पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया अध्यापन/ शैक्षणिक कार्य मुल्यमापन पध्दतीमध्ये अमुलाग्र बदल करणे गरजेचे आहे. पुढील काळात माहिती तंत्रज्ञानाचा वापर अधिकाधिक करावा लागणार आहे. तसेच महाविद्यालयात कोरोनाचे संकट वाढु नये यासाठी शासन विद्यापीठ अनुदान आयोग आणि विद्यापीठाच्या माध्यमातुन दिल्या जाणाऱ्या सुचना आणि दिशा-निर्देश पालन करीत उपाययोजना आम्ही करत आहोत.

विद्यार्थांनी आपला सर्वांगीन विकास साधण्यासाठी महाविद्यालयातील उपलब्ध सुविधा व साधनांचा उपयोग करतांना महाविद्यालयाच्या नियमांचे आणि शिस्तीचे पालन करावे.

आपण सर्वांना माझ्या व संचालक मंडळाच्या वतीने हार्दिक शुभेच्छा... !

**मनोज शा.कोठारी**

संचालक

# श्री सरस्वती
## समाजकार्य महाविद्यालय

सर्वांसाठी उच्च शिक्षण : विश्वमानवता

### उच्चविद्या विभुषीत व अनुभवी प्राध्यापक

| प्राध्यापकांचे नाव | शिक्षण | अनुभव | मोबाईल नंबर |
|---|---|---|---|
| १. प्र.प्राचार्य यु. एस. जमधाडे | M.S.W., NET | २० वर्ष | 9271619954 |
| २. सह.प्रा.डॉ. एस. एन. शिंदे | M.S.W, M.Phil., Ph.D | २१ वर्ष | 9673580777 |
| ३. सहा.प्रा. एस. एन. भदरगे | M.S.W, SET. | १२ वर्ष | 8087665557 |
| ४. सहा.प्रा. आर. एन. इंगोले | M.A.(Sociology)NET | १२ वर्ष | 8007992196 |
| ५. सहा. प्रा. डॉ. ए. पी. राऊत | M.S.W, M.Phil.,Ph.D. | १२ वर्ष | 9545477577 |
| ६. सहा. प्रा. डॉ. एस. टी. राठोड | M.S.W, M.Phil., Ph.D. | १२ वर्ष | 8275730288 |
| ७. सहा. प्रा. डॉ.कु.एस.एच.उजाडे | M.S.W., M.Phil., Ph.D.MA | १२ वर्ष | 9923046160 |
| ८. सहा. प्रा. ए. एन. बोहरपी | M.S.W, M.Phil. | १२ वर्ष | 9766965956 |
| ९. सहा. प्रा. डॉ.आर. एस. मडावी | M.S.W., M.Phil.,Ph.D.,M.A. | १२ वर्ष | 9881584904 |
| १०. सहा. प्रा. यु. ए. घुगे | M.S.W, M.Phil. | १२ वर्ष | 9049588553 |
| ११. सहा. प्रा. डॉ.पी. व्ही. बुकणे | M.S.W., M.Phil.,Ph.D. M.Com.,G.D.C.& A., | १२ वर्ष | 9822715454 |
| १२. सहा. प्रा. व्ही. बी. गावंडे | M.S.W., M.Phil. | १२ वर्ष | 9657703272 |
| १३. सहा. प्रा. डॉ. डी. एस. आंभोरे | M.A.(Psy), B.Ed., M.Phil, Ph.D. | ७ वर्ष | 9420133177 |
| १४. सहा. प्रा. डी. एस. गोरे | M.S.W, SET | ७ वर्ष | 9923454713 |
| १५. सहा. प्रा. कु. पी. एन. संधानी | M.S.W, NET | ७ वर्ष | 9763478336 |
| १६. सहा. प्रा. एस. आर. इंगोले | M.S.W, NET | ७ वर्ष | 9604124647 |
| १७. सहा. प्रा. ए. टी. वाघ | M.S.W, NET | ७ वर्ष | 9921226874 |
| १८. सहा. प्रा. यु. एस. बनकर | M.S.W, NET, SET | ७ वर्ष | 9552128674 |
| १९. सहा. प्रा. डी. पी. लांडगे | M.S.W., SET | ६ वर्ष | 8888688506 |
| २०. ग्रंथपाल कु. व्ही. डी. इंगळे | M.sc.M.Lib, NET | ६ वर्ष | 9767229686 |
| २१. सहा. प्रा. डी. एस. कव्हर | M.S.W., M.Phil., SET | २ वर्ष | 9923490745 |
| २२. सहा. प्रा. कु.के. डी. पतंगराव | M.S.W., M.Phil., NET | २ वर्ष | 9130504359 |
| २३. सहा. प्रा. ए. बी. काकडे | M.S.W., M.Phil., NET, SET | २ वर्ष | 9767777931 |

# श्री सरस्वती
## समाजकार्य महाविद्यालय

### शिक्षकेत्तर कर्मचारी

| नाव | शिक्षण | पद | मोबाईल नंबर |
|---|---|---|---|
| १. कु.डि.एम.मुंदडा | B.Com., MSCIT | अधिक्षक | 9579898283 |
| २. बि.एच.पट्टेबहादुर | M.A., MSCIT | लेखापाल | 8766941065 |
| ३. कु.सी.व्ही हिवाळे | B.A., Shorthand, MSCIT | स्टेनो | 9604902977 |
| ४. एम.ए.पिंजरकर | M.S.W., Shorthand, MSCIT | लिपीक | 9850388331 |
| ५. आर.एस.तनमने | M.A., B.Lib., MSCIT | ग्रंथालय सहा. | 9423436142 |
| ६. बि.एच.वाघ | M.A.,B.P.Ed., B.Ed.,M.Lib.,MSCIT | ग्रंथालय व्या.सहा. | 8308347983 |
| ७. जे.ए.कांबळे | B.A., B.Lib., MSCIT | ग्रंथालय सहा. | 8888646335 |
| ८. ए.पी.कायंदे | B.A., MSCIT | ग्रथालय लिपीक | 9673234999 |
| ९. एन.एस.तनमने | B.A., C.Lib., MSCIT | ग्रंथालय सहा. | 9922645642 |
| १०. आर.जि.केंदळे | B.Com., C.Lib., MSCIT | ग्रंथालय सहा. | 9881450015 |
| ११. जि.के.धोंगडे | HSC | ग्रंथालय शिपाई | 8149870412 |
| १२. सौ.एल.बी.सोनोने | 7th Std. | शिपाई | 8698826609 |
| १३. एस.व्ही.दामोधरे | SSC | पाहरेकरी | 8329168813 |
| १४. एस.ए.आमले | B.S.W. | पाहरेकरी | 7020859652 |
| १५. ए.आर.खोडे | 9th Std. | शिपाई | 9922477037 |
| १६. एस.एम.मडके | SSC | माळी | 8329157342 |
| १७. जी.एस.फुफाटे | SSC | पाहरेकरी | 9765466513 |
| १८. एस.पी.मडके | B.A., B.Lib.,MSCIT | ग्रंथालय शिपाई | 9921081309 |
| १९. व्ही.बी.मोहळे | HSC | वाहन चालक | 7387833668 |






## प्रवेश पात्रता

**बी.एस.डब्ल्यु.**

महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाची १२ वी ची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या कोणत्याही विद्यार्थ्यांस समाजकार्य स्नातक (बी.एस.डब्ल्यू) सेमिस्टर-१ साठी प्रवेश घेता येईल. तसेच भारतातील समकक्ष उत्तीर्ण झालेले विद्यार्थी प्रवेशास पात्र आहेत. अथवा समाजकार्य पदविका प्रमाणपत्र (सी.एस.डब्ल्यू.)परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी,अथवा स्नातक परीक्षेच्या प्रथम वर्षाला अनुत्तीर्ण झालेले विद्यार्थी प्रवेशाला पात्र आहेत.

- समाजकार्य स्नातक सेमिस्टर २ ला प्रवेश घेण्यासाठी क्षेत्रकार्यासह सं.गा.बा.अ.विद्यापीठाच्या नियमानुसार विषय उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.
- सेमिस्टर ३ ला प्रवेश घेण्यासाठी सेमिस्टर-१ व सेमिस्टर २ च्या क्षेत्रकार्यासह सं.गा.बा.अ.विद्यापीठाच्या ATKT नियमानुसार विषय उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.
- सेमिस्टर ४ ला प्रवेश घेण्यासाठी सेमिस्टर-१ व २ पुर्ण उत्तीर्ण व सेमिस्टर ३चे क्षेत्रकार्य व सं.गा.बा.अ.विद्यापीठाच्या ATKT नियमानुसार विषय उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.
- सेमिस्टर ५ व ६च्या प्रवेशासाठी, सेमिस्टर १ ते ३ पुर्ण उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. व सेमिस्टर ४ व ५ च्या क्षेत्रकार्यासह सं.गा.बा.अ.विद्यापीठाच्या ATKT नियमानुसार विषय उत्तीर्ण असलेल्या पात्र विद्यार्थ्यांनाच प्रवेश दिला जाईल.

**एम.एस.डब्ल्यु.**



- समाजकार्य पारंगत सेमिस्टर १ च्या प्रवेशासाठी समाज कार्य स्नातक, तसेच कोणत्याही यु.जि.सी.मान्यताप्राप्त असलेल्या महाराष्ट्र राज्यातील विद्यापीठाची पदवी परिक्षा द्वितीय श्रेणी (४५% किंवा त्यापेक्षा अधिक) मध्ये उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.अमरावती विद्यापीठाच्या नियमानुसार महाविद्यालयाची प्रवेश पुर्व पात्रता परिक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. पात्र विद्यार्थ्यांनाच एम.एस.डब्ल्यु सेमिस्टर १ ला प्रवेश दिला जाईल.
- समाजकार्य पारंगत सेमिस्टर २ला प्रवेश घेण्यासाठी, सेमिस्टर १च्या क्षेत्रकार्यासह १/३ विषय उत्तीर्ण आवश्यक आहे.
- समाजकार्य पारंगत सेमिस्टर ३ला प्रवेश घेण्यासाठी सेमिस्टर १ व २ च्या क्षेत्रकार्यासह सं.गा.बा.अ. विद्यापीठाच्या ATKT नियमानुसार उत्तीर्ण झालेले विद्यार्थी प्रवेशास पात्र राहतील.
- समाजकार्य पारंगत सेमिस्टर ४ला प्रवेश घेण्यासाठी सेमिस्टर १ व २ पुर्ण उत्तीर्ण असणे आवश्यक आहे, सोबतच सेमिस्टर ३ च्या क्षेत्रकार्यासह सं.गा.बा.अ.विद्यापीठाच्या ATKT नियमानुसार विषय उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे.

## प्रवेशाची पध्दत

**बी.एस.डब्ल्यु.**

- महाविद्यालयात प्रवेशासाठी प्रथम शुल्क भरुन माहितीपत्रक व प्रवेश अर्जाचा छापील नमुना घ्यावा. प्रवेश अर्ज स्वत:च्या अक्षरात भरुन कार्यालयात आवश्यक त्या कागदपत्रांसोबत सादर करावा.
- प्रवेश अर्जाची छाननी करुन प्रत्यक्ष मुलाखत घेतल्या नंतरच प्रवेश निश्चित केला जाईल कारण बी.एस.डब्ल्यू. भाग १ व एम.एस.डब्ल्यू भाग १ ला प्रत्येकी फक्त ८० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो.
- महाराष्ट्र शासन तसेच सं.गा.बा.अ.वि.ने दिलेल्या आरक्षणाप्रमाणे प्रवेश देण्यात येतो.

**एम.एस.डब्ल्यु.**

प्रवेश घेणाऱ्या इच्छूक विद्यार्थ्यांनी विहीत मुदतित प्रथम नोंदणी करणे आवश्यक आहे. संगाबाआवि च्या नियमानुसार पदविच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना नोंदणी करता येईल.नोंदनी केल्यानंतर (CET) प्रवेश पूर्व पात्रता परिक्षा घेण्यात येईल, त्या नंतर पात्र विद्यार्थ्याची गटचर्चा व वैयक्तीक मुलाखत घेण्यात येईल, त्यानंतर गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांची यादी प्रसिध्द करण्यात येईल. प्रवेश मर्यादेनुसार जाहीर झालेल्या यादीनुसार महाविद्यालयात ठरवून दिलेल्या दिनांकाच्या आत पात्र विद्यार्थ्यांनी मुळ कागदपत्रासह प्रवेश निश्चित करणे बंधनकारक राहील, उशिरा आलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश देता येणार नाही, तसेच प्रवेशाच्या वेळी पदवी परिक्षा द्वितीय श्रेणी मध्ये उत्तीर्ण असणे बंधनकारक आहे. सं.गा.बा.अ.वि.च्या नियमाप्रमाणे ग्राह्य धरलेल्या पदवी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना एम.एस.डब्ल्यु.सेमिस्टर १ला प्रवेश घेता येईल.

## नौकरीच्या संधी

बी.एस.डब्ल्यु. किंवा व एम.एस.डब्ल्यु. अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना समाज कल्याण विभागात परिविक्षा अधिकारी, अधिक्षक, समाजकल्याण अधिकारी, विस्तार अधिकारी इ. पदावर नियुक्त होता येते. तसेच समाजकल्याण विभागाद्वारे अनुदानीत आश्रमशाळा, अपंग, अंध विद्यालय इत्यादीमध्ये अधिकारी पदावर, वैद्यकीय क्षेत्रामध्ये वैद्यकिय समाजकार्यकर्ता, जेलमध्ये अधीक्षक, कारखान्यामध्ये लेबर इन्सपेक्टर, कामगार अधिकारी, सामुदायीक विकास क्षेत्रामध्ये विस्तार अधिकारी, प्रकल्प अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, जलस्वराज्य, जिल्हा सामान्य रुग्णालय, जिल्हा परिषद, नगर परिषद व मोठे कारखाने इत्यादी क्षेत्रामध्ये सहज नोकरीच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. यामुळे आपण करीत असलेल्या अभ्यासाचा शास्त्रीय दृष्टीकोन लक्षात घेऊन स्वहीत सांभाळणे अत्यंत आवश्यक असते. विकास कार्यामध्ये लोक सहभागाचे महत्व दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे समाजकार्याच्या विद्यार्थ्यांसाठी नवनवीन क्षेत्रात नोकरीच्या संधी उपलब्ध होत आहेत. नगर विकास मंत्रालयात तर गरीब गलीच्छवस्ती सुधार कार्यासाठी अधिकाऱ्यांच्या जागा याच क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी प्राधान्याने राखल्या जातात. अभ्यास करीत असतांना व्यक्तिमत्व विकास, सहकार्याची भावना, सामुदायिक जाणीव, समाजामध्ये काम करण्यासाठी आवड यामुळे समाजकार्य स्नातक व पारंगत झालेले विद्यार्थी यशस्वी कारखानदार व व्यापारी झालेले आज आपणास दिसुन पडतील. अशा नाविन्यपूर्ण अभ्यासक्रमात प्रवेश घेऊन आपण आपले उज्वल भविष्य निश्चित करा. आपल्या घरासमोर चालत आलेल्या सुवर्ण संधीचा सदुपयोग करा.

## महाविद्यालयाची नियमावली

- महाविद्यालयात दररोज सकाळी १० : ३० च्या आत गणवेशात ओळखपत्रासह हजर रहावे.
- महाविद्यालयाची दैनंदीनी सकाळी सार्वजनीक प्रार्थनेने सुरु होते.
- प्रवेश पात्र विद्यार्थ्यांनी त्यांची मुळ प्रमाणपत्रे कार्यालयात सादर करावी लागतील.
- संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठा शिवाय इतर विद्यापीठातून आलेल्या विद्यार्थ्यांना प्रवजन प्रमाणपत्र प्रवेश घेतांना द्यावे लागते व विद्यापीठाची आवश्यक ती फी भरावी लागते. अन्यथा विद्यार्थी वार्षिक परीक्षेला बसू शकत नाहीत.
- द्वितीय प्रत (डुप्लीकेट) टी.सी. वर प्रवेश दिला जाणार नाही.
- ए.टी.के.टी. सवलत सं.गा.बा.अ.वि.च्या नियमानुसार उपलब्ध राहील.
- परिक्षेचे आवेदनपत्र भरण्याकरीता विद्यार्थ्यांची ७५% उपस्थिती अनिवार्य आहे, अन्यथा परिक्षा फॉर्म भरता येणार नाही.
- विद्यार्थ्यांनी महाविद्यालय मध्येच सोडल्यास संपूर्ण वर्षाचे शुल्क भरावे लागेल.
- प्रथम वर्षी प्रवेशीत विद्यार्थ्यांस नामांकन (इनरोलमेंट) अर्ज भरावा लागेल. वेळेच्या आत नामांकन न केल्यास होणाऱ्या नुकसानास संबंधीत विद्यार्थी स्वत: जबाबदार राहील.
- महाविद्यालयाची कोणतीही माहिती प्राचार्यांच्या परवानगी शिवाय विद्यार्थ्यांना वर्तमानपत्रात किंवा इतर ठिकाणी छापण्यासाठी देता येणार नाही.
- विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या मालमत्तेचे उदा.फर्निचर,विद्युत इ.सामानाचे नुकसान करु नये.
- आवेदनपत्र भरत असतांना विद्यार्थ्यांनी स्वत:चा संपूर्ण पत्ता व संपर्क अचुकपणे लिहावा.
- महाविद्यालयाच्या कार्यालयामधुन घ्यावयाचे कोणतेही प्रमाणपत्र किंवा महाविद्यालय सोडण्याचा दाखला इ. सर्व साधारणत: अर्ज दिल्या नंतर तिसऱ्या दिवशी मिळेल.
- प्राचार्यांना महाविद्यालयाच्या कोणत्याही नियमात बदल करण्याचा व नविन नियम करण्याचा अधिकार आहे.
- कोणत्याही सहलीकरीता रेल्वे/एसटी बसने प्रवास करावा लागेल.
- महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांना माहिती पुस्तकातील सर्व नियम व उपनियम मान्य व बंधनकारक आहेत.
- **शासन व्दारा दिलेले कोविडचे संपुर्ण नियम पाळणे बंधनकारक आहेत.**

## समाजकार्य स्नातक
## बी.एस.डब्ल्यु. (कालावधी ३ वर्षे)

### अभ्यासक्रम

**सेमिस्टर -१**

इंग्रजी (अनिवार्य) DSC-1
मराठी DSC-2
इंग्रजी संभाषण कौशल्य ACE-1
व्यावसायीक समाजकार्याची ओळख DSC-5
मराठी संभाषण कौशल्य ACE-2
क्षेत्रकार्य DSC-6
मानसशास्त्राची मुलतत्वे DSC-3
जेनरिक ओपन इलेक्टीव GOEC-1
समाजकार्यासाठी समाजशास्त्र DSC-4
अभिमुखीकरण प्रक्रिया

**सेमिस्टर -२**

समाजकार्यासाठी समाजशास्त्र DSC-8
मानवी वाढ आणि विकास DSC-7
कुटुंब व बालकल्याण कार्य DSC-11
समाजकार्य मध्यस्थी करिता वैयक्तिक आणि व्यावसायिक कौशल्य DSC-12
क्षमता वृध्दी पाठ्यक्रम AEC for DSC-12
व्यक्ती सोबत कार्य DSC-9
जेनरीक ओपन इलेक्टीव-२
क्षेत्रकार्य DSC-10

**सेमिस्टर -३**

५०३१- इंग्रजी (अनिवार्य)
५०३२- मराठी
५०३३- समाजकार्याच्या क्षेत्रामध्ये मानसशास्त्र
५०३४- समाजशास्त्र
५०३५- गटासोबत कार्य -१
५०३६- आरोग्य समस्या आणि समाजकार्य मध्यस्ती
५०३७- कुटूंब व बालकल्याण
५०३८- सामाजिक संशोधन आणि संगणकांचे उपयोजन-१
५०३९- क्षेत्रकार्य

**सेमिस्टर -४**

५०४१- इंग्रजी (अनिवार्य)
५०४२- मराठी
५०४३- समाजकार्याच्या क्षेत्रामध्ये मानसशास्त्र
५०४४- समाजशास्त्र
५०४५- गटासोबत कार्य-२
५०४६- मानसोपचार समाजकार्य
५०४७- असुरक्षीत बालके
५०४८- सामाजिक संशोधन आणि संगणकांचे उपयोजन-२
५०४९- क्षेत्रकार्य

**सेमिस्टर -५**

५०५१- समाजशास्त्र (भारतातील सामाजिक समस्या)
५०५२- समुदायासोबत कार्य
५०५३- समाजकल्यान आणि विकासात्मक प्रशासन
५०५४- गुन्हेगारी आणि गुन्हेगारांची न्याय व्यवस्था
५०५५- मानवी संसाधन व्यवस्थापन आणि असंघटीत कामगार
५०५६- उद्योगाची सामाजिक जबाबदारी
५०५७- युवकांच्या विकासात समाजकार्य मध्यस्ती
५०५८- वृध्दांची काळजी आणि समाजकार्य मध्यस्ती
५०५९- क्षेत्रकार्य

**सेमिस्टर -६**

५०६१- समाजशास्त्र (सामाजिक विचारवंत)
५०६२- समाजकार्यात सहभागित दृष्टीकोन
५०६३- कायदा आणि समाजकार्य
५०६४- भारतातील महिलांची स्थिती
५०६५- अपंगत्व आणि समाजकार्य
५०६६- राजकारणाची ओळख
५०६७- आपत्ती व्यवस्थापन व आणि समाजकार्य
५०६८- शांती शिक्षण
५०६९- क्षेत्रकार्य

**क्षेत्रकार्यामध्ये गट संशोधन प्रकल्प अहवाल,समुदाय संघटन व शैक्षणिक अभ्यास दौरा सं.गा.बा.अ.विद्यापीठाच्या निर्देशानुसार राहील.**

**Any change may occur in academic syllabus, examination pattern or subjects without any prior notice as per the guidelines and directions by SGB Amravati University & Govt. of Maharashtra.

**मौखिक परिक्षा : अंतर्गत व बाह्य**

विद्यापीठाने नियुक्त केलेल्या अंतर्गत व बहिर्गत परिक्षकांद्वारे सेमिस्टर १ ते सेमिस्टर ६ची विद्यार्थ्यांची मौखिक परिक्षा घेतली जाते व त्यामध्ये विद्यार्थ्याने केलेल्या कार्याचा अहवाल सादर करावा लागतो. हे सर्व क्षेत्रकार्य करते वेळी त्या विद्यार्थ्यांना त्या कार्याची नोंद करुन व त्याचा अहवाल मार्गदर्शकांकडे जमा करणे आवश्यक आहे. सेमिस्टर सहा करीता गट संशोधन कार्य करावे लागेल.

## समाजकार्य स्नातकोत्तर (पारंगत)
## एम.एस.डब्ल्यु. (कालावधी २ वर्षे)

### अभ्यासक्रम

**सेमिस्टर -१**

समाजशास्त्र DSC-1
मानसशास्त्र DSC-2
समाजकार्याचा इतिहास,विचारधारा व सराव DSC-3
सामाजिक व्यक्तीसहाय्य आणि गटकार्य DSC-4
सामाजिक संशोधन आणि संगणक उपयोजन DSC-5
AEC-1 for DSC-5
कौशल्य वृध्दी पाठ्यक्रम SEC-1
क्षेत्रकार्य DSC-6

**सेमिस्टर -२**

समाजशास्त्र DSC-7
मानसशास्त्र DSC-8
समाजकार्याचे क्षेत्र DSC-9
मानवाधिकार आणि सामाजिक न्याय DSC-10
समाजकार्य करिता वैयक्तिक आणि व्यावसायिक कौशल्य DSC-11
AEC-2 for DSC-11
क्षेत्रकार्य DSC-12

**सेमिस्टर -३**

५२३१- समुपदेशन : सिध्दांत आणि सराव
५२३२- समाज कल्याण आणि विकास प्रशासन
५२३३- समाज कार्यकर्त्यासाठी व्यवसायीक विकास
५२३४- समुदायासोबत कार्य

...विशेषीकरण **(Specialization)**...

**C.D. Specialization**

५२३५- ग्रामीण समुदाय विकास
५२३६- शहरी समुदाय विकास
५२३७- आदिवासींची सामाजिक व्यवस्था

**HRM Specialization**

५२४१- मावनी संसाधन विकास
५२४२- कामगार फायदे व औद्योगीक संबंध
५२४३- कर्मचारी कल्याण व कामगार संघटना

**सेमिस्टर -४**

५२५१- सामाजिक धोरण, नियोजन आणि विकास
५२५३- सामाजिक क्रिया
५२५२- सामाजिक कायदे आणि भारतातील कायदे व्यवस्था

**C.D. Specialization**

५२५४- संशोधन प्रकल्प अहवाल
५२५५- ग्रामीण विकासाचे दृष्टीकोन
५२५६- शहरी विकास प्रशासन
५२५७- आदिवासी विकास आणि आदिवासी विकासाच्या योजना
५२५८- क्षेत्रकार्य

**HRM Specialization**

५२६०- संशोधन प्रकल्प अहवाल
५२६१- भारतातील संघटनात्मक वर्तन आणि सामाजिक घटक
५२६२- मावनी संसाधन विकास
५२६३- कर्मचारी अर्थशास्त्र व कामगार समस्या
५२६४- क्षेत्रकार्य

महाविद्यालयाच्या वेळापत्रकानुसार बी.एस.डब्ल्यु व एम.एस.डब्ल्यु.या सर्व वर्गाच्या क्षेत्रकार्याचे दिवस व वेळ निश्चीत करण्यात येईल.

आमच्या महाविद्यालयात UGC च्या NSQF या योजने अंतर्गत डिप्लोमा व डिग्रीचे व्यावसायीक अभ्यासक्रम चालविले जातात.



# ग्रंथालय

## खुले ग्रंथालय योजना

महाविद्यालयाच्या प्रशस्त ग्रंथालयामध्ये बारा हजार पेक्षा अधिक पुस्तके उपलब्ध आहेत. तसेच स्पर्धा परिक्षे संबधी पुस्तके, मासीके, दैनिक वर्तमानपत्रे या मध्ये सामान्य ज्ञान, शब्दकोष व विविध राष्ट्रीय नेत्यांची चरित्र, आत्मचरित्र उपलब्ध आहेत. तसेच समाजकार्याशी संबधीत विविध विषयाचे १२ जर्नल्स ग्रंथालयाव्दारे उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांकरीता पुस्तक पेढी (Book Bank) सुविधा आहे.

**अत्याधुनिक Digital Library सुविधा आहे.**

ग्रंथालयातील वाचन कक्षामध्ये विद्यार्थी अभ्यासा करिता बसु शकतात यासाठी पुस्तकाची कोणतीही मर्यादा नाही. परिक्षेच्या पुर्व काळात व परिक्षेच्या काळात सुट्यामध्ये विद्यार्थ्यांना महाविद्यालयात वाचन कक्षाची सोय केलेली आहे. ग्रंथालयात SOUL सॉफ्टवेअर आहे. ग्रंथालयात विद्यार्थ्यांना इंटरनेट सुविधा देण्यात येते. विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढ हाच एकमेव उद्देश महाविद्यालयाचा आहे. eJournals करीता N-List चे Subscription केले आहे.

## ग्रंथालयाचे नियम :

१) प्रवेशीत विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचे सभासद होणे अनिवार्य आहे.
२) ग्रंथालयाचे सभासद होण्याकरिता प्रथम ग्रंथालय अर्ज भरावा लागेल त्या करिता ओळखपत्र सोबत असणे आवश्यक आहे.
३) विद्यार्थ्यांस ग्रंथालयातून प्रत्येकी पाच(बुक बँक सुविधे अंतर्गत) पुस्तके मिळतात.
४) पुस्तकाची देवाण-घेवाण करण्याकरिता सोबत बि.टी.कार्ड असणे आवश्यक आहे.
५) ग्रंथालयातून मिळालेले पुस्तक आठ दिवसाच्या आत ग्रंथालयामध्ये परत करावेत किंवा नुतणीकरण करावे.
६) ग्रंथालयातील पुस्तके, मासिके, नियतकालीके काळजीपूर्वक हाताळावीत. त्याचे नुकसान झाल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.
७) ग्रंथालय प्रमुखाच्या पुर्वपरवानगी शिवाय कोणत्याही वर्तमान पत्रातील कात्रण कापून घेवू नये अन्यथा दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.
८) ग्रंथालय व वाचन कक्षात लावलेल्या विशेष नियमावलीचे काटकोरपणे पालन करावे.

# विद्यार्थी कल्याण परिषद

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती च्या नियमाअंतर्गत विद्यार्थी कल्याण परिषद कार्यरत असून प्रत्येक वर्गामध्ये शिस्त व गुणवत्ता वाढ समिती आहे. या मार्फत स्पर्धा, भाषणे इत्यादी कार्यक्रम सातत्याने सुरु असतात. त्या मार्फतच क्रिडा विभाग कार्यरत आहे. महाविद्यालयाकडे मोठे खेळाचे मैदान व साहित्य उपलब्ध आहे.



दिव्यांग राष्ट्रीय T-20 क्रिकेट स्पर्धेत करण मुंधरे यांची निवड

# शिष्यवृत्ती

१. जे विद्यार्थी भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेतात, अश्या विद्यार्थ्यांनी आपले भारत सरकार शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाईन भरणे आवश्यक आहे.

२. शिष्यवृत्ती धारकांनी किंवा आर्थिक सवलतीचा फायदा घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी आवश्यक ते अर्ज सर्व प्रमाणपत्रासह व माहितीसह १० ऑगष्ट पुर्वी कार्यालयामध्ये जमा करणे आवश्यक आहे.

३. महाविद्यालयामध्ये प्रथम प्रवेश घेणाऱ्या शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांनी आपले जिल्हा बदलीचे प्रमाणपत्र (आवश्यक असल्यास) व मागील शिष्यवृत्ती मंजूरात पत्र जोडावे.

४. शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती घेण्याकरिता व कुठलीही सवलत घेण्याकरिता महाविद्यालयामध्ये, दैनिक परिसंवाद, क्षेत्रकार्यामध्ये प्रत्येक विषयात ७५ टक्के उपस्थिती अनिवार्य आहे. ज्या विद्यार्थ्यांची ७५ टक्के उपस्थिती नसेल अशा विद्यार्थ्यांना कुठलीही सवलत महाविद्यालयाकडून मिळणार नाही. यामुळे होणाऱ्या शैक्षणिक, आर्थिक नुकसानास विद्यार्थी स्वत: जबाबदार राहील.

५. एका वेळी एकाच शिष्यवृत्तीचा फायदा विद्यार्थ्यांना घेता येईल व शिष्यवृत्ती संबंधीच्या सुचना फलकावर लावण्यात येतील.

६. विद्यार्थ्यांने कुठलीही आर्थिक सवलत घेतांना किंवा शिष्यवृत्ती अर्ज सादर करतांना तहसिलदार यांच्या सहीचे उत्पन्नाचे दाखले शासकिय नियमाप्रमाणे सादर करावे.

७. शासनाच्या नियमाप्रमाणे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती त्यांच्या राष्ट्रीयकृत बँकेतील वैयक्तीक खात्यात शासन जमा करेल त्या साठी शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्याने राष्ट्रीयकृत बँकेत आपले खाते उघडून बँक पासबुकची झेरॉक्स व आधार कार्डची झेरॉक्स महाविद्यालयाच्या संबंधीत विभागाकडे जमा करावी.

८. महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या शासन निर्णय क्र. इ.बी.सी.-२०१७/प्र.क्र.५२४/ शिक्षण-१ दि. २९ जानेवारी २०१८ नुसार कार्यवाही करावी लागेल.

९. सर्व शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांना आपले खाते क्रमांक आधार नंबरशी लिंक करणे अनिवार्य आहे.

१०. शासनाच्या भारत सरकार शिष्यवृत्ती मध्ये महाराष्ट्र शासनाने वेळो-वेळी केलेल्या बदलानुसार विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती संबंधी कार्यवाही करावी लागेल.

११. जे विद्यार्थी भा.स.शि., शिक्षण फी, परिक्षा फी योजनेचे अर्ज भरनार नाहीत व ते भा.स.शि. व फ्रशिप योजनेपासुन वंचित राहील्यास त्याची जबाबदारी महाविद्यालयाची राहनार नाही व त्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची संपुर्ण फी भरवी लागेल.

१२. स्वाधार व स्वयंम योजनेचा लाभ घेण्याकरीता विद्यार्थ्याची ८०% उपस्थिती अनिवार्य आहे.

१३. जे विद्यार्थी भारत सरकार शिष्यवृत्ती,स्वाधार,स्वयंम शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क व इतर योजनेचा लाभ घेतात त्या सर्व विद्यार्थ्यांना आपला मोबाईल नंबर व बँक खाते क्रमांक,आधार क्रमांकाशी (Link) जोडणे अनिवार्य आहे. अन्यथा कुठल्याही योजनेचा लाभ मिळणार नाही.

१४. विद्यार्थ्यांनी आधार क्रमांकाशी (Link) जोडणी केलेल्या मोबाईल नंबरवर वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या सुचनेनुसार विद्यार्थ्यांना कार्यवाही करावी लागेल.तेव्हाच विद्यार्थ्यांना सर्व योजनांचा लाभ मिळेल.

शिष्यवृत्ती योजनेचे ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरतांना विद्यार्थी





सर्वांसाठी उच्च शिक्षण : विश्वमानवता

## राष्ट्रीय सेवा योजना

**महाविद्यालयामध्ये २०००-२००१ पासुन राष्ट्रीय सेवा योजना पथक कार्यरत आहे.**

१) ज्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजना पथका मध्ये प्रवेश घ्यावयाचा आहे. त्यांनी कार्यक्रम अधिकारी यांच्याशी प्रथम संपर्क करुन प्राथमिक प्रवेश विनंती अर्ज करावा.

२) विद्यार्थ्यांची आवड व पात्रता लक्षात घेऊनच रासेयो पथकामध्ये प्रवेश दिल्या जाईल.

३) प्रवेश संख्या मर्यादित असल्याने वेळोवेळी आयोजित नियमित तासिकेला उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यालाच निवड समिती प्रवेश देईल.

४) दोन वर्षे सतत प्रवेश घेऊन व एक विशेष शिबीर स्वयंसेवकास पूर्ण करावे लागेल.

५) रासेयो पथकामध्ये प्रवेश व शिबीरासाठी विद्यार्थ्यांची निवड त्यांच्या आचरणावरुन समिती करेल. व समितीचा निर्णय अंतीम राहील.

६) राष्ट्रीय सेवा योजना पथकाचा वर्ग शनिवारी व नियमानुसार घेण्यात येतील.

७) नियमित उपस्थिती, शिस्तीचे पालन, आज्ञाधारकपणा इ. गुण लक्षात घेऊनच शिबीरात मर्यादित विद्यार्थ्यांची निवड केली जाईल.

## विद्यार्थ्यांकरीता उपक्रम

**स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन कक्ष :** महाविद्यालयात स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन कक्ष स्थापन केलेला आहे स्पर्धा परिक्षा कक्षाच्या माध्यमातुन विविध तज्ञ मान्यवरांचे मार्गदर्शन मिळत असते. तसेच स्पर्धा परिक्षाची विविध लेखकांची उच्च दर्जाची पुस्तके ग्रथालयात उपलब्ध आहेत.दर आठवड्यातुन एक दिवस स्पर्धा परिक्षाचे तास महाविद्यालयात घेतले जातात. यासाठी महाविद्यालयाकडून कोणतेही शुल्क आकारले जात नाही.

**प्रशिक्षण व व्यवसाय मार्गदर्शन केंद्र :** प्रशिक्षण व व्यवसाय मार्गदर्शन केंद्र कार्यरत असुन वर्तमानपत्रे, साप्ताहिके, समाजकार्याची संशोधन लेख (जरनर्स) उपलब्ध आहेत व संबंधीत समिती वेळोवेळी विद्यार्थ्यांना नौकरी, व्यवसायाकरीता मार्गदर्शन करीत आहे व आजपर्यंत महाविद्यालयातील अधिकतम विद्यार्थी नौकरीला लागले आहेत.

**सुविचार :** प्रत्येक वर्गात पहिल्या तासात सुविचार लेखन विद्यार्थ्यांच्या हस्ते फळयावर लिहिन्यात येते आणि त्यानंतर तो सुविचार विद्यार्थ्यांच्या वहिमध्ये लिहिल्या जातो.

**माजी विद्यार्थी :** महाविद्यालयामध्ये माजी विद्यार्थी संघ कार्यरत आहे व माजी विद्यार्थ्यांचा मेळावा आयोजित करण्यात येतो. या सत्रामध्येसुध्दा मेळावा आयोजित करणे आहे.

**अंतर्गत परिक्षा :**

गुणवत्ता वाढीसाठी प्रत्येक वर्गाच्या प्रत्येक विषयाच्या घटक चाचणी व वार्षिक सराव परीक्षा घेण्यात येतात. प्रत्येक विद्यार्थ्याला या परीक्षेला बसणे अनिवार्य आहे व पास होणे आवश्यक आहे.

**वार्षिकांक व भित्तीपत्रके/हस्तलिखीत :**

विद्यार्थ्यांचा बौध्दीक, साहित्यिक, सांस्कृतिक विकास होण्यासाठी सुरुवातीपासुनच विविध कार्यक्रम व भिंतीपत्रके वर्गवार काढण्यात येतात व वर्षाच्या शेवटी वार्षिकांकामध्ये या बाबींची नोंद घेऊन वार्षिकांक प्रसिध्द करण्यात येतो.

**पालक-शिक्षक मेळावा :** पालक, शिक्षक, विद्यार्थी मेळावा दरवर्षी आयोजित केला जातो.

**कॅम्पस इंटरव्ह्यु :** आजी-माजी विद्यार्थ्यांसाठी रोजगार निर्मिती करिता महाविद्यालयात नामांकित संस्थांना बोलावुन कॅम्पस इंटरव्ह्यु आयोजीत करण्यात येईल.

**वायफाय सुविधा :** विद्यापिठाने जीओ कंपनीसोबत केलेल्या करारानुसार महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरीता मोफत शैक्षणीक उपयोगा करीता वायफाय सुविधा उपलब्ध आहे.

**गुणवत्ता पारितोषीके (विद्यापीठ परिक्षेत मेरीट)**

महाविद्यालयाच्या स्थापनेपासुन दरवर्षी विद्यार्थी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत आहे. या सर्वांचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात येतो, व त्यांच्या पालकांचा त्यांच्या गावी जावुन गावकऱ्यासमोर सत्कार करण्यात येतो.

**शिस्त**

महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांची शिस्त समिती उपलब्ध असुन परिसरामध्ये शिस्त राहण्यासाठी सर्व विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यरत असतात.

**लैंगिक छळप्रतिबंध समिती**

महाविद्यालयामध्ये ही समिती कार्यरत आहे. प्राचार्य व प्राध्यापक सोबत महाविद्यालयातील काही विद्यार्थी व विद्यार्थींनी या समितीमध्ये घेण्यात येतात. त्यामुळे अशा प्रकारच्या प्रतिबंधामुळे महाविद्यालयाचे वातावरण निकोप राहते.

**वार्षिक नियोजन**

अभ्यास व अभ्यासेत्तर कार्यासाठी समिती कार्यरत असुन सुरुवातीलाच वार्षिक नियोजन करण्यात येते व वेळोवेळी नियोजन व्यवस्थित होत आहे किंवा नाही याचे सिंहावलोकन करण्यात येते.

**अपघात विमा योजना**

विद्यापीठ नियमाप्रमाणे रक्कम प्राप्त होवु शकते.

**उपहार गृह**

महाविद्यालयामध्ये विद्यार्थी/ विद्यार्थीनीसाठी उपहारगृहाची सोय योग्य दरामध्ये करण्यात आली आहे.

**सुचना पेटी**

महाविद्यालयाशी संबंधीत काही सुचना विद्यार्थ्यांना सुचवायच्या असल्यास त्याकरीता महाविद्यालयात सुचना पेटी उपलब्ध आहे.

**प्रथमोपचार पेटी**

महाविद्यालयातील कार्यालयामध्ये प्रथमोपचार पेटीची सेवा उपलब्ध आहे.

## RAGGING ACT

According to ragging prevention act.1999, ragging is strictly prohibited and students are totally protected by the law accordingly. Those who are victim of ragging. i.e. student/Parent OR Teacher should file complaint in written to the principal.



सर्वांसाठी उच्च शिक्षण : विश्वमानवता

## फी संबंधी तपशील

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती अधिसुचना क्र. ५०/२०१५ दि. १८.६.२०१५ नुसार शुल्काचा तपशिल

| अ.क्र. | विवरण | बी.एस.डब्ल्यु. भाग १,२,३ | एम.एस.डब्ल्यु. भाग १,२ |
|---|---|---|---|
| १. | क्षेत्रकार्य | ४८५ | ९६० |
| २. | ग्रंथालय शुल्क | १६० | ८०० |
| ३. | क्रिडा शुल्क | १६० | १६० |
| ४. | Extra Curri Activities | ८५ | ८५ |
| ५. | वार्षिकांक शुल्क | ८५ | ८५ |
| ६. | विद्यार्थी सहाय्यता निधी | ३५ | 0 |
| ७. | विद्यार्थी सुरक्षा विमा योजना | १० | १० |
| ८. | वैद्यकीय सहाय्यता निधी | ३० | 0 |
| ९. | शारिरीक पात्रता चाचणी | ५५ | 0 |
| १०. | पर्यावरण शास्त्र फी | १६०(भाग २) | 0 |
| ११. | सुविधा शुल्क | ८५ | ८५ |
| १२. | वार्षिक फी | ८५ | ८५ |
| १३. | नामांकन फी (प्रथम वर्षासाठी) | १२० | 0 |
| १४. | महाविद्यालयीन परीक्षा फी | १२० | १२० |
| १५. | ओळखपत्र शुल्क | ३५ | ३५ |
| १६ | शिक्षण शुल्क | ८०० | १००० |
| १७ | वाहनतळ | ६० | ६० |
| १८ | सुरक्षा | ६० | ६० |

**उपरोक्त शुल्का मध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती व शासनाने वेळोवेळी केलेले बदल बंधनकारक राहतील.**

**कार्यालयीन वेळ :** सकाळी १०.३० ते सायं. ५.३०

## गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | गुणवता विवरण | वर्ग | वर्ष |
|---|---|---|---|---|
| १) | कु.प्रिया अनिलकुमार जोशी | विद्यापीठातुन प्रथम | एम.एस.डब्ल्यु | २००१-०२ |
| २) | मलिनाथ रेवनसिध्द अनचे | विद्यापीठातुन प्रथम | एम.एस.डब्ल्यु | २००३-०४ |
| ३) | कु.सारीका बाबाराव काळे | विद्यापीठातुन प्रथम | बी.एस.डब्ल्यु | २००४-०५ |
| ४) | चंद्रकांत वसंता बेलखेडे | विद्यापीठातुन तृतिय | एम.एस.डब्ल्यु | २००४-०५ |
| ५) | कु.माया शंकरराव सूर्यवंशी | विद्यापीठातुन प्रथम | बी.एस.डब्ल्यु | २००५-०६ |
| ६) | कु.उषा दिनकरराव भगत | विद्यापीठातुन द्वितीय | एम.एस.डब्ल्यु | २००५-०६ |
| ७) | कु.जयश्री इंद्रपालजी देवहंस | विद्यापीठातुन तृतिय | एम.एस.डब्ल्यु | २००५-०६ |
| ८) | मिलींद रंजन घुगे | विद्यापीठातुन दहावा | एम.एस.डब्ल्यु | २००५-०६ |
| ९) | कु.सारीका बाबाराव काळे | विद्यापीठातुन प्रथम | एम.एस.डब्ल्यु | २००६-०७ |
| १०) | सखाराम अशोकराव बोरकर | विद्यापीठातुन चौथा | एम.एस.डब्ल्यु | २००६-०७ |
| ११) | विनोद मारोतराव मुसळे | विद्यापीठातुन दहावा | एम.एस.डब्ल्यु | २००६-०७ |
| १२) | प्रदिप श्रीराम दळवे | विद्यापीठातुन प्रथम | बी.एस.डब्ल्यु | २००६-०७ |
| १३) | कु.रेखा जनार्धन बनसोड | विद्यापीठातुन पाचवी | बी.एस.डब्ल्यु | २००६-०७ |
| १४) | कु.किरण शेषराव देशमुख | विद्यापीठातुन द्वितीय | एम.एस.डब्ल्यु | २००७-०८ |
| १५) | दत्ता रंजीत चोपडे | विद्यापीठातुन सातवा | एम.एस.डब्ल्यु | २००७-०८ |
| १६) | गणेश रामचंद्र तांदळे | विद्यापीठातुन नववा | एम.एस.डब्ल्यु | २००७-०८ |
| १७) | जितेंद्र चंद्रभान खिल्लारे | विद्यापीठातुन नववा | एम.एस.डब्ल्यु | २००७-०८ |
| १८) | विनोद अंबादास इंगोले | विद्यापीठातुन द्वितीय | बी.एस.डब्ल्यु | २००७-०८ |
| १९) | धम्मपाल भिमराव पंडीत | विद्यापीठातुन पाचवा | बी.एस.डब्ल्यु | २००७-०८ |
| २०) | संतोष रामचंद्र काळे | विद्यापीठातुन तृतिय | एम.एस.डब्ल्यु | २००८-०९ |
| २१) | रवि ज्ञानदेव राऊत | विद्यापीठातुन प्रथम | बी.एस.डब्ल्यु | २००८-०९ |
| २२) | पांडूरंग नामदेवराव गोटे | विद्यापीठातुन पाचवा | बी.एस.डब्ल्यु | २००८-०९ |
| २३) | संदिप वसंता राठोड | विद्यापीठातुन सातवा | बी.एस.डब्ल्यु | २००९-१० |
| २४) | सुनिल भगवान ठाकरे | विद्यापीठातुन तिसरा | बी.एस.डब्ल्यु | २००९-१० |
| २५) | योगेश सुदाम इंगोले | विद्यापीठातुन नववा | बी.एस.डब्ल्यु | २००९-१० |
| २६) | कु.श्रध्दा विश्वनाथ चक्रे | विद्यापीठातुन दहावी | बी.एस.डब्ल्यु | २००९-१० |
| २७) | कु.सुष्मा अशोक घरडे | विद्यापीठातुन पाचवी | एम.एस.डब्ल्यु | २००९-१० |
| २८) | रामकृष्ण विठ्ठल धाडवे | विद्यापीठातुन प्रथम | बी.एस.डब्ल्यु | २०१०-११ |
| २९) | कु.प्रियंका राजेश राऊत | विद्यापीठातुन प्रथम | एम.एस.डब्ल्यु | २०१०-११ |
| ३०) | कु. राधा शंकर कानडे | विद्यापीठातुन द्वितीय | बी.एस.डब्ल्यु | २०११-१२ |
| ३१) | कु. शारदा दत्तात्रय जोगदंड | विद्यापीठातुन प्रथम | एम.एस.डब्ल्यु | २०११-१२ |
| ३२) | कु. परविन शौकत शेख | विद्यापीठातुन आठवी | एम.एस.डब्ल्यु | २०११-१२ |
| ३३) | आकाश बबन इंगोले | विद्यापीठातुन तृतीय | बी.एस.डब्ल्यु | २०१२-१३ |
| ३४) | रामकृष्ण विठ्ठल धाडवे | विद्यापीठातुन द्वितीय | एम.एस.डब्ल्यु | २०१२-१३ |
| ३५) | रमेश काशिराम वाघ | विद्यापीठातुन दहावा | एम.एस.डब्ल्यु | २०१२-१३ |
| ३६) | युवराज किसन वैद्य | विद्यापीठातुन चौथा | बी.एस.डब्ल्यु | २०१३-१४ |
| ३७) | नारायण बळीराम गोरे | विद्यापीठातुन पाचवा | बी.एस.डब्ल्यु | २०१३-१४ |
| ३८) | योगेश्वर श्रीकिसन ताकतोडे | विद्यापीठातुन सहावा | बी.एस.डब्ल्यु | २०१३-१४ |
| ३९) | राष्ट्रपाल बबन इंगोले | विद्यापीठातुन तृतिय | एम.एस.डब्ल्यु | २०१३-१४ |
| ४०) | प्रसिध्द युवराज इंगोले | विद्यापीठातुन दहावा | एम.एस.डब्ल्यु | २०१३-१४ |
| ४१) | गणेश जयवंता पैठणकर | विद्यापीठातुन प्रथम | बी.एस.डब्ल्यु | २०१४-१५ |
| ४२) | कु. पुजा भारत विश्वनाथवार | विद्यापीठातुन व्दितीय | बी.एस.डब्ल्यु | २०१४-१५ |
| ४३) | संदिप हनुमान वाकुडकर | विद्यापीठातुन चतुर्थ | बी.एस.डब्ल्यु | २०१४-१५ |
| ४४) | कु.कविता श्रीकृष्ण सरकटे | विद्यापीठातुन चतुर्थ | एम.एस.डब्ल्यु | २०१५-१६ |
| ४५) | शुभम सुर्यकांत काळमुदळे | विद्यापीठातुन सातवा | बी.एस.डब्ल्यु | २०१६-१७ |
| ४६) | गणेश जयवंता पैठणकर | विद्यापीठातुन प्रथम | एम.एस.डब्ल्यु | २०१६-१७ |
| ४७) | कु. पुजा भारत विश्वनाथवार | विद्यापीठातुन द्वितीय | एम.एस.डब्ल्यु | २०१६-१७ |
| ४८) | दिवाकर अंबादास इंगोले | विद्यापीठातुन द्वितीय | एम.एस.डब्ल्यु | २०१६-१७ |
| ४९) | मनोज श्रीरंग बगाटे | विद्यापीठातुन चौथा | एम.एस.डब्ल्यु | २०१६-१७ |
| ५०) | नामदेव कडूजी देव्हडे | विद्यापीठातुन पाचवा | एम.एस.डब्ल्य | २०१६-१७ |
| ५१) | कु. आरती ज्ञानेश्वर देशमुख | विद्यापिठातुन तृतीय | बी.एस.डब्ल्यु | २०१७-१८ |
| ५२) | कु. ममता श्रीकिसन जाधव | विद्यापिठातुन चतुर्थ | बी.एस.डब्ल्यु | २०१७-१८ |
| ५३) | कु.संतोषी रामभाऊ नालंदे | विद्यापिठातुन द्वितीय | बी.एस.डब्ल्यु | २०१८-१९ |
| ५४) | कु.माधुरी नारायण गोटे | विद्यापिठातुन नववी | बी.एस.डब्ल्यु | २०१८-१९ |
| ५५) | कु.शामबाला विष्णु जाधव | विद्यापिठातुन दहावी | एम.एस.डब्ल्यु | २०१८-१९ |
| ५६) | कु.प्रियंका तेजराव मोरे | विद्यापिठातुन पाचवा | बी.एस.डब्ल्यु | २०१८-१९ |
| ५७) | कु.रोहिनी पुरुषोत्तम केळे | विद्यापिठातुन आठवा | बी.एस.डब्ल्यु | २०१९-२० |
| ५८) | कु.ममता श्रीकिसन जाधव | विद्यापिठातुन प्रथम | एम.एस.डब्ल्यु | २०१९-२० |
| ५९) | कु.आरती ज्ञानेश्वर देशमुख | विद्यापिठातुन चतुर्थ | एम.एस.डब्ल्यु | २०१९-२० |
| ६०) | कु.संतोषी रामभाऊ नालिंदे | विद्यापिठातुन पाचवी | एम.एस.डब्ल्यु | २०२०-२१ |


एम.एस.डब्ल्यु मध्ये विद्यापीठातुन प्रथम मेरिट


एम.एस.डब्ल्यु मध्ये विद्यापीठातुन चतुर्थ मेरिट


बी.एस.डब्ल्यु मध्ये विद्यापीठातुन आठवा मेरिट



सर्वांसाठी उच्च शिक्षण :
विश्वमानवता












































सर्वांसाठी उच्च शिक्षण :
विश्वमानवता


























आमच्या संस्थेच्या संचालिका

## स्व.सौ.कांचनदेवी श्यामसुंदर कोठारी

यांना प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी व महाविद्यालया तर्फे

# भावपूर्ण आदरांजली...

